**नि. फौ. खटला क्र.१७/२०२३**

**निशाणी क्र.२४**

**:: अभियोग पक्षातर्फे सा.क्र.०१ चा पुरावा ::**

**शपथेवर सत्य निवेदन करतो की,**

**माझे नांव** : समदपाशा रुकमोद्दीन शेख,

**वय** : ५२ वर्षे, **धंदा** : शेती,

**राहणार** : वलांडी, ता. देवणी, जि. लातूर.

**:: अभियोग पक्षातर्फे सरतपासणी साहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस.एम. हाशमी यांचेमार्फत ::**

मी आरोपींना ओळखतो. ते न्यायालयमध्ये हजर आहेत. दि.२३/०५/२०२५ रोजी रात्री ८.०० वाजता माझ्या घरी वलांडी येथे घटना घडली. मी, माझा मुले अल्ताफ, अफताफ, तब्बू असे मिळून घरी होतो. त्यावेळी आरोपी क्र.१ ते ४ हे माझ्या घरी आले आणि अल्ताफला माझ्याकडे बघतोस काय म्हणून शिवीगाळ करीत होते. अल्ताफने शिवीगाळ का करता असे विचारले. सर्व आरोपींनी त्याला मारहाण केली. मी त्यांना का मारता असे विचारले असता आरोपी रियाजोद्दीन याने माझ्या डोळ्याच्या वरती भुवईवर विट मारली. आरोपी तस्लीमने अल्ताफला काठीने मारले आणि ईतर आरोपींनी अल्ताफला लाथाबुक्क्यांनी मारले. आता मला काठी दाखविली. ही तीच आहे. त्यास **वस्तूचिन्ह अ** देण्यात येते. त्यानंतर आम्ही दरवाजे आणि खिडक्या बंद करून घरामध्ये बसलो. आरोपींनी माझ्या घराच्या खिडक्या आणि काच दगड मारून फोडले, दरवाजे मोडले होते. आरोपींनी आम्हाला जीवे मारण्याची धमकी दिली. सदर गल्लीमध्ये लग्न सुध्दा होते आणि लग्नातील ४० ते ५० लोक तेथे बघायला आले होते.

०२. त्यानंतर आम्ही पोलीस ठाणे देवणी येथे गेलो. पोलिसांनी आम्हाला दवाखान्यात पाठविले होते. त्यानंतर आमचा उपचार झाला. त्यानंतर मी पोलीस ठाण्यामध्ये घटनेबाबत खबर दिली. आता मला खबर दाखविली. ही तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यावरील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी २५** देण्यात येते.

सरतपास पूर्ण.

:: <u>आरोपीकरिता उलटतपास अधिवक्ता श्री. एम.बी. पाटील यांच्यामार्फत</u> ::

०३. माझा मुलगा अल्ताफ याचा मोबाईल क्र.८९२८९८२३१२ हा आहे. हे म्हणणे खरे नाही की, अल्ताफकडे ईतर दोन मोबाइल क्रमांक आहेत. हे मला माहीत नाही की, अल्ताफ हा आरोपी क्र.२ फिरदोसला मोबाईलवरून घाण–घाण संदेश पाठवित होता. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.४ रियाजोद्दीन यांनी गावातील पंच विजय पाटील, बाबूराव पाटील व नामदेव भंडारे यांच्यासमोर संदेश पाठविल्याबाबत पंचाकडे बैठक घेतली होती. सदर बैठकीमध्ये अल्ताफचा मोबाइल तपासला असता त्यावरून फिरदोसला घाण–घाण संदेश पाठविल्याचे आढळून आले होते याबाबत मला माहीत नाही. आम्ही बैठकीमध्ये माफी मागितली होती असे घडले होते. हे म्हणणे खरे नाही की, अल्ताफ फिरदोसला संदेश करीत होता व त्यामुळे आरोपी क्र.४ ने दि.०२/०४/२०२२ रोजी त्याच्याविरुध्द पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, अल्ताफ घाण संदेश पाठवितो याबाबत आरोपीने मला एक–दोनदा सांगितले होते.

०४. हे मला माहीत नाही की, दि.२५/०५/२०२३ रोजी आरोपी तस्लीम, ऐशा आणि रियाजोद्दीन हे कंदुरीच्या कार्यक्रमाला बोरवाडी येथे गेले होते. त्यादिवशी फिरदोस ही एकटीच घरी होती हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, अल्ताफने फिरदोसच्या घरी जाऊन तिच्याशी छेडछाड केली व त्याबाबत पोलीस केस झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, दि.२६/०५/२०२३ रोजी माझ्या, माझ्या पत्नीच्या आणि मुलांच्या विरुध्द पोलीस ठाणे देवणी येथे गुन्हा क्र.१५८/२०२३ दाखल झाला होता.

०५. माझ्याकडे मोटरसायकल आहे. मी ती वापरतो. हे म्हणणे खरे नाही की, अल्ताफ मोटरसायकल वापरतो. गोळा झालेल्या ४०–५० लोकांमध्ये आरोपींचे नातेवाईक होते. त्यामध्ये माझ्या ओळखीचे महेमुद सौदागर व माझा मेव्हाण हामजाम मासुलदार होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे घर लोकवस्तीमध्ये आहे. माझे शेजारी नमूद भांडण बघायला आणि सोडवायला आले होते. पोलीस चौकशीकरिता आले होते. परंतु त्याची तारीख मी सांगू शकत नाही. पोलिसांनी मला वस्तूचिन्ह 'अ' वरील काठी कधीही दाखविली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, दि.२३/०५/२०२५ रोजी कोणतीही घटना

घडली नाही. मी आणि माझे दोन मुले दवाखान्यामध्ये गेलो होतो. त्यानंतर आम्ही पोलीस ठाण्यामध्ये गेलो होतो.

०६. माझी मुलगी तब्बू समद शेख आहे. ती पुणे येथे वडगाव शेरी येथे राहते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस ठाण्यामध्ये गेल्यानंतर तस्लीमने आमच्याविरुध्द रिपोर्ट दिल्याचे समजले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरीफ बौडीवाले, मजलोद्दीन बौडीवाले हे माझ्या ओळखीचे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी केस केली. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना शिक्षा होण्यासाठी खोटी साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**.

दि.१८/१०/२०२५.